# पर्यावरण आणि आदिवासी समूह यांचे नाते खूप जुने आणि दृढ: लेफ्टनंट डॉ. मनीषा सावंत




निसर्गातील पर्यावरणाशी एकरुप होणारी जमात म्हणजे आदिवासी समाज होय. पर्यावरण आणि आदिवासी समूह यांचे नाते खूप जुने आणि दृढ आहे.आदिवासी समुदाय निसर्गाच्या जवळ राहतात आणि त्यांच्या जीवनशैलीत पर्यावरणाचा मोठा प्रभाव असतो त्यांचे जीवन हे पर्यावरण पूरक आहे नैसर्गिक संसाधनांचा मर्यादित वापर करून त्यांची जीवनशैली सुरू आहे.त्यांच्या मनामध्ये निसर्गाबद्दल असणारे प्रेम आपणही आत्मसात केले तर निसर्गाचे संवर्धन होण्यासाठी मदत होईल असे प्रतिपादन लेफ्टनंट डॉ. मनीषा सावंत यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्टस् अँण्ड सायन्स कॉलेज , माळवाडी-कोतोली येथील फॅकल्टी डेव्हलपमेंट कमिटी मार्फत आयोजित केलेल्या पर्यावरण आणि आदिवासी समूह या विषयावर आयोजित केलेल्या व्याख्यान प्रसंगी मार्गदर्शन करताना लेफ्टनंट डॉ. मनीषा सावंत बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील होते.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. विजयकुमार पाटील म्हणाले आदिवासी समूहाची वाटचाल खडतर आहे पण पर्यावरण पूरक आहे त्यांचे अनुकरण आपण केले तर पर्यावरण संतुलन राहील.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था सचिव शिवाजीराव पाटील , अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रोफेसर डॉ.बी.एन. रावण,डॉ.यु.एन.लाड होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ.एस. एस.कुरलीकर यांनी केले तर आभार डॉ.व्ही.पी.पाटील यांनी मानले.

कार्यक्रमास सर्व शिक्षक,प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.